मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना –अनुसूचित जाती अंतर्गत राज्यातील पात्र लाभार्थ्यांना ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (Refill) मोफत उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : विसउस/ का-४(अर्थ)/मु,अ.यो.(अ.ज.)/२०२४-२५/प्र.क्र.५९१
जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स, ८ वा मजला,
लो.टि.मार्ग, मुंबई-४००००१.
दिनांक : ०७/०४/२०२५

संदर्भ :- १)अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्र.घगॅस-२०२४/प्र.क्र.५८/नापु-२७, दि.३० जुलै,२०२४
२) अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग शासन निर्णय क्र.घगॅस-२०२४/प्र.क्र.५८/नापु-२७, दि.०४ सप्टेंबर, २०२४
३) नियोजन विभाग/१४७५ यांचे अ.नौ.सं.क्र.१४/का.१४११, दि. ३१.०१.२०२५
४) महालेखाकार कार्यालय यांचे अ.नौ.सं.क्र.सं:खवि/चा-१/अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग/यूओआर-२८३/ २०२४-२५/२१६५, दि. २९.०१.२०२५
५) वित्त विभाग/अर्थ-७ यांची दि.०५/०२/२०२५ रोजीची टिप्पणी

प्रस्तावना :-

"मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना " या योजनेस दि. ११ जुलै २०२४ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असून, दि. ३० जुलै २०२४ व दि.०४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील पात्र लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुर्नभरण (Refill) मोफत उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजनेकरीता वित्त विभागाकडून दि.२२/११/२०२४ रोजीच्या टिप्पणीन्वये मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना-अनुसूचित जाती अंतर्गत नवीन लेखाशिर्ष घेण्याबाबत सूचित केलेले आहे.

त्यानुसार वित्त विभागाच्या टिपणीन्वये 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' अनुसुचित जाती अंतर्गत नवीन लेखाशिर्ष उघडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

त्यासअनुसरुन मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना- अनुसुचित जाती अंतर्गत खालीलप्रमाणे नवीन लेखाशिर्ष उघडण्यात आला आहे.

मागणी क्र.	**एन-०३**	**Demand No.**	**N-03**
प्रधान शिर्ष	२४०८-अन्न साठवण व वखार साठवण	**Major Head**	2408-Food Storage and Warehousing
उप प्रधान शिर्ष	०१-अन्न	**Sub Major Head**	01-Food
गौण शिर्ष	७८९-अनुसुचित जातींसाठी विशेष घटक योजना	**Minor Head**	789-Special Component Plan for Scheduled Castes

गट शिर्ष	०१-अनुसुचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना	**Group Head**	01-Schemes under Schedule Caste Component Scheme
उप शिर्ष	०२	**Sub Head**	02
गट शिर्ष	११ - सामाजिक आणि सामुदायिक सेवा	**Group Head**	11-Social and community services
	मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना (कार्यक्रम) (दत्तमत) (२४०८०८९७),३३ अर्थसहाय्य		Mukhya Mantri Annapurna Yojana (Scheme) (Voted) (24080897),33 Subsidy

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. १४/का.१४११ दि.३१.०१.२०२५ तसेच मा. महालेखापाल कार्यालयाच्या अनौ.संदर्भ क्र. २१६५ दि. २९.०१.२०२५ च्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२५०४०७१५३९१८७५०६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGAWAN D GHADGE

Digitally signed by BHAGAWAN D GHADGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=594768d258a8666080fc21067f8670c4d266b96697d0c8d8cb65dd57ac09077d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=602F3A3CF9C6CA046F310EE1BA1CE4DC964C9612358A87F7261E09064EB4ABCB, cn=BHAGAWAN D GHADGE
Date: 2025.04.07 15:40:44 +05'30'

(भगवान दत्तात्रय घाडगे)
वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
६. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व)यांचे खाजगी सचिव.
८. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. अपरमुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
११. महालेखाकार, महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
१५. सर्व उप आयुक्त (पुरवठा),

१६. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरणअधिकारी,
१९. सर्व उपनियंत्रक (शिधावाटप) कार्यालये.
२०. सर्व सहसचिव/उपसचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२२. निवडनस्ती.